**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को)**
दुसरा मजला रायगड इमारत घोरपडी, पुणे-४११००१
संपर्क :- ०२०-२६३०२६५९, मो.नं.:-९३७३१६४९६२
ई मेल :- CONTACT@MESCOLTD.CO.IN

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को) मध्ये भारतीय सेना दलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना खालील पदावर करार पध्दतीने नेमणुकीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **ठोक मानधन** | **नियुक्त करावयाची पदे** | **नियुक्तीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता** |
|---|---|---|---|---|
| १ | महाव्यवस्थापक | **किमान** ८०,०००/- | ०१ | १. कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२. निवृत्तीचे वेळेस स्थलसेनेतील कर्नल, नौदल व वायुदलातील समकक्ष धारण केलेल्या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | १. क्षेत्रीय व्यवस्थापक अमरावती पद-०१ | **किमान** ७०,०००/- | ०१ | १. कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२. निवृत्तीचे वेळेस स्थलसेनेतील ले. कर्नल, मेजर, किंवा नौदल व वायुदलातील समकक्ष धारण केलेल्या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

**वरील दोन पदासांठी अटी व शर्ती :-**

१. सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील करार पध्दतीवरील राहील. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही. तसेच करार कालावधीतील सेवा नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.
२. करार पध्दतीवरील नियुक्त केलेल्या कालावधीतील उमेदवाराचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने १ महिन्याची नोटीस देवून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
३. सदर पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशी अथवा पोलीस गुन्हा दाखल असता कामा नये.
४. सदर पदावरील नियुक्तीचा कालावधी प्रथमत: ३६० दिवसाचा राहील.
५. करार पदावर निवड झालेल्या अधिकाऱ्यास प्रवास भत्ता व दैनिक भत्ता हा शासन निर्णयानूसार देण्यात येईल.
६. निवड झालेल्या अधिकाऱ्यांना महामंडळाचे कामकाज हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानूसारच करावे लागेल.
७. भारतीय सेनादलातून स्वेच्छा/ सेवानिवृत्तीनंतर मेस्को/ शासनामध्ये यापूर्वी पुनर्वसन झाले नाही त्यांना प्रथम प्राधान्य राहील.
८. पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी लेखी पत्र किंवा दुरध्वनीव्दारे बोलविण्याची कार्यवाही केली जाईल.
९. वरील निवड करावयाच्या पदाचा विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडण्यात यावेत.
१०. अर्ज स्विकारणे / नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवलेले आहेत.
११. पात्र उमेदवारांनी आपले अर्ज या कार्यालयात संपूर्ण माहितीसह मेलवर वा प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिनांक ०९.१०.२०२४ पर्यंत पाठवावेत. या तारखेनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

व्यवस्थापकीय संचालक,मेस्को,पुणे

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को) येथे**
**सेवानिवृत्त माजी सैनिक अधिकारी यांची महाव्यवस्थापक व व्यवस्थापक या पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबतचा**

# विहीत नमुन्यातील अर्ज

उमेदवाराचे फोटो स्वाक्षरीसह

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | |
| २ | ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव | |
| ३ | शैक्षणिक अर्हता | |
| ४ | जन्मदिनांक | |
| ५ | सध्याचे वय | |
| ६ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ७ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ८ | सध्या मिळणारे सेवानिवृत्ती वेतन (महागाई भत्त्यासह) | |
| ९ | विभागीय चौकशी / पोलीस गुन्हा दाखल आहे किंवा कसे | |
| १० | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता | |
| ११ | ई-मेल | |
| १२ | मोबाईल नंबर | |

मी प्रतिज्ञापूर्वक नमुद करतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. सदरचे काम करार पध्दतीने करण्यासाठीची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून त्यातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. ही माहिती चुकीची अगर खोटी आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी स्वत: जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : (उमेदवाराची नाव व स्वाक्षरी)

सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी